महाराष्ट्र शासन
आयुक्त
वैद्यकीय शिक्षण व आयुष, महाराष्ट्र राज्य
४था मजला, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई -४०० ००१
दुरध्वनी - (०२२) - २२६२०३६३-६५ संकेतस्थळ - med-edu.in

क्र.संवैशिवस/नीट-युजी-२०२३/प्रवेश प्रक्रिया/नियमावली पुस्तिका/236/सीईटी आयटी/२०२३, दिनांक : २७/०७/२०२३

प्रति,

मा. आयुक्त,
राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष,
८वा मजला, न्युएस्सीसीआर इमारत,
मुंबई

विषय : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ राज्यस्तरीय कोट्याच्या नीट-युजी २०२३ प्रवेश परीक्षा/प्रवेश प्रक्रियाच्या नियमावली पुस्तिका संकेस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत...

संदर्भ : वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन पत्र क्रमांक एमईडी १०२३/प्र.क्र.२८९/२३/शि-२ दिनांक : २६.०७.२०२३

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाकरिता "नीट-युजी-२०२३ पात्रता परिक्षा केंद्र शासनामार्फत घेण्यात आलेली आहे. सदर परिक्षांच्या गुणांच्या आधारे राज्यस्तरीय कोट्यातील शासकीय, महानगरपालिका, शासन अनुदानित वैद्यकीय/दंत महाविद्यालयातील आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांचेमार्फत राबविण्यात येतात. त्याअनुषंगाने राज्यस्तरीय कोट्याच्या नीट-युजी २०२३ नियमावली पुस्तिका संचालनालयास्तारवर तयार करून शासनाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आलेली होती..

त्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, राज्यस्तरीय कोट्याच्या नीट-युजी २०२३ नियमावली पुस्तिकेस शासन पत्र एमईडी १०२३/प्र.क्र.२८९/२३/शि-२ दिनांक २६.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने नीट-युजी २०२३ प्रवेश प्रक्रियेची नियमावली पुस्तिका राज्स सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी व प्रवेश प्रक्रिया पार पाडण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

सोबत,
राज्यस्तरीय नीट-युजी-२०२३ नियमावली पुस्तिका.

प्रत,
मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, ९वा मजला, गो.ते. रुग्णालय इमारत, मुंबई

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
गो.ते.रूग्णालय आवार, ९ वा मजला,
लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय,
मुंबई - ४०० ००१.

क्र.एमईडी-१०२३/प्र.क्र.२८९/२३/शि-२ दि.२६/०७/२०२३

प्रति,
आयुक्त,
वैद्यकीय शिक्षण, मुंबई.

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२३-२४
राज्यस्तरीय कोट्याच्या नीट-युजी २०२३ माहिती पुस्तिकेस मान्यता मिळणेबाबत....

संदर्भ:- १. आपले पत्र क्र.संवैशिवस/नीट-युजी-२०२३/प्रवेश प्रक्रिया/नियमावली पुस्तिका /२२१/सीईटी आयटी/२०२३, दि.१८/०७/२०२३.
२. आपले पत्र क्र.संवैशिवस/नीट-युजी-२०२३/प्रवेश प्रक्रिया/नियमावली पुस्तिका /२३३/सीईटी आयटी/२०२३, दि.२५/०७/२०२३.

महोदय,

आपल्या संदर्भाधीन पत्रास अनुसरुन नीट-युजी २०२३ प्रवेश प्रक्रियेकरिताची माहिती पुस्तिका सोबत जोडली आहे.

२. आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसंदर्भात केंद्र शासन / राज्य शासन / केंद्रीय परिषदा / मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेले आदेश लागू राहतील.

३. माहिती पुस्तिकेचे प्रुफ रिडींग (Proof Reading) करून सदर माहिती पुस्तिका प्रसिध्द करण्याकरिता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडे तातडीने पाठविण्यात यावी.

सहपत्र : वरीलप्रमाणे

आपला,
(प्रदीप कोपार्डे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
१. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.
२. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई - ४०० ००१.
३. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई-४०० ००१.
४. निवडनस्ती (शिक्षण-२) (माहिती पुस्तिकेच्या छायांकित प्रतीसह)